ाग चार ता. क्र.३८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑगस्ट १, २००६ / श्रावण १०, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

१८८८ चा मुंबई ३. २००५ चा महा. ४४.

२००६ चा महा. अध्या. ७.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

न २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.——कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र राज्यास लागू सताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. २७४–२७५

दिनांक २१ जुलै २००६ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, सिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १ ऑगस्ट २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

**कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९४८ चा ६३. **ज्याअर्थी,** कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, कारखाने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[किंमत : रुपये ९.००]

सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ६३ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २, खंड (ड) मध्ये,—

(क) '' उपाहारगृह किंवा खाद्यगृह '' या मजकुरानंतर, '' अथवा पुष्पसंवर्धन किंवा फळबागायत किंवा उच्च मूल्यांकित पिकांची लागवड हे उपक्रम करत असलेले पॉली हाऊस किंवा हरितगृह '' हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

(ख) स्पष्टीकरण दोन नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

'' **स्पष्टीकरण तीन.**—या खंडाच्या प्रयोजनाकरिता, '' उच्च मूल्यांकित पिकांची लागवड '' या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणे असून त्यात पुढील बाबींचा समावेश होतो,—

(एक) हरितगृहामध्ये किंवा शेड-नेट हाऊसमध्ये (जाळीच्या छपराच्या घरामध्ये) फळझाडे, फुलझाडे व भाजीपाला यांची लागवड ;

(दोन) विदेशी फळझाडे, फुलझाडे व भाजीपाला यांची लागवड ;

(तीन) जैव-तंत्रज्ञानाद्वारे रोपांची निर्मिती करून घेण्यात येणाऱ्या पिकांची लागवड ;

(चार) औषधी आणि सुगंधी वनस्पतींची लागवड व प्रक्रिया उद्योग ;

(पाच) अळंबीचे उत्पादन व प्रक्रिया उद्योग ;

(सहा) प्लास्टिक व आर्द्रतारोधक आवरणाचा (mulching) वापर करून सूक्ष्म ठिबक सिंचनाद्वारे फळांचे उत्पादन ;

(सात) जेथे भाजीपाल्याची रोपे हरितगृहामध्ये तयार केली जातात असे रोपमळे आणि प्रक्रिया उद्योग ;

(आठ) शोभेच्या झाडांचे रोपमळे ;''.